# मिरा भाईंदर महापालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महापालिकेच्या सर्व शाळांचा एकत्रित महा-स्नेहसंमेलन**
- **विद्यार्थ्यांच्या नृत्याविष्कारातून महाराष्ट्राची गौरवशाली संस्कृतीचे दर्शन**

मिरा-भाईंदर - शनिवार, ११ जानेवारी २०२५: प्रत्येक शाळांचे स्वतंत्र वार्षिक स्नेहसंमेलन होत असते. मात्र यंदा मिरा भाईंदर महापालिकेने सर्व महापालिका शाळांचे एकत्रित महा स्नेहसंमेलन आयोजित केले. शनिवार, ११ जानेवारी रोजी भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृहात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांचा 'सांस्कृतिक कार्यक्रम २०२५' वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या जल्लोषात संप्पन्न झाला. सर्व शाळांचे एकत्रित संमेलन घेण्याचा हा पहिलाच प्रयोग होता. या सोहळ्यात महाराष्ट्राच्या संस्कृतीचे, परंपरांचे दर्शन विद्यार्थ्यांच्या नृत्याविष्कारातून रंगमंचावर सादर करण्यात आले. यावेळी, शालेय विद्यार्थ्यांमधील प्रतिभेला मंनोरंजन क्षेत्रात संधी मिळावी म्हणून विद्यार्थ्यांचे ऑडिशन घेणार तसेच विद्यार्थ्यांना कला क्षेत्रातील ज्ञान मिळावे यासाठी संगीत-नृत्य शिकवण्यासाठी कला शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची घोषणा मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांनी केली.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३६ शाळा असून, साडे नऊ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, त्यांच्यातील कला सादर करण्यासाठी व्यापक मंच मिळावा यादृष्टीने महापालिकेने शाळांचा एकत्रितरित्या स्नेहसंमिलन सोहळा साजरा करण्यात आला. 'सांस्कृतिक कार्यक्रम २०२५' या नावाने सर्व शाळांचे एकत्रिक महास्नेहमसंमेलन पार पडले.

या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी गणेश वंदनेने कार्यक्रमास सुरुवात केली. महाराष्ट्राच्या लोकधारेतून राज्यातील विविध भागांतील परंपरेचे आणि लोककलांचे दर्शन घडले, तर आदिवासी नृत्य, शेतकरी नृत्य, कोळी नृत्य, सण-उत्सव, देशभक्ती आदी नृत्याविष्कार सादर झाले. विद्यार्थ्यांनी, मासिक पाळीबाबत जागृती करणारे, बालिका ते स्त्रीचा प्रवास दाखवणारे आदी अनोखी नृत्ये सादर करून सामाजिक प्रगल्भतेचे दर्शन घडवले. तसेच, लीलीपुट सारखा आगळा-वेगळा पपेट्री थिएटर फ्रेंच नृत्य या सोहळ्यात सादर करण्यात आला. या कार्यक्रमात, पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

- महापालिका शाळेत कला शिक्षकांची नियुक्ती करणार

विद्यार्थ्यांमधील कलागुण आणि त्यांच्यातील प्रतिभा पाहून आयुक्त देखील भारावून गेले होते. पालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांमधील प्रतिभेला मंनोरंजन क्षेत्रात संधी मिळावी म्हणून विद्यार्थ्यांच्या मुलाखती (ऑडिशन) घेण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना कला क्षेत्रातील ज्ञान मिळावे यासाठी संगीत-नृत्य शिकवण्यासाठी कला शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे, असे आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांनी यावेळी जाहीर केले आहे.

या कार्यक्रमास, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, कार्यकारी अभियंता शरद नाणेगावकर, सर्व मनपा शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच दूरचित्रवाणीच्या फिक्शन आणि नॉन फिक्शन मालिकांचे शुटींग मिरा-भाईंदरमध्ये करणारे स्टुडीओ प्रमुख-मालक उपस्थित होते.

- विद्यार्थ्यांनी मानले महापालिकेचे आभार

मिरा भाईंदर महानगरपालिकेने, मनपा शाळेत शिक्षक भरती केली तसेच क्रिडा शिक्षकांची नेमणूक केली. शालेय विद्यार्थ्यांना वेळच्यावेळी गणवेश दिले, अभ्यासिका, अधिकवर्ग, कम्प्युटर लॅब, विज्ञान प्रयोगशाळा आदी उपलब्ध करून दिले. शाळांच्या इमारतींची दुरुस्ती आणि डागडुजी केली. वेळोवेळी शाळांचे पर्यवेक्षण करून समस्या दूर केल्या. सातत्याने शाळांचे अद्ययावतीकरणासाठी प्रयत्न केले.

मागील एका वर्षात मनपा शाळांचा स्तर उंचावला असून, याबद्दल या सोहळ्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व ३६ शाळांतील शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे आयुक्तांना गुलाब देऊन कृतज्ञता व्यक्त केली. शाळेच्या माजी विद्यार्थिनीने एक चित्रफित बनवून आयुक्तांच्या कामाचा गौरव करत आभार मानले.